पु.ने.ता. १५/१२/१५

किरकोळ अर्ज क्र. 209/2014

मंजूर 13-03-15

मा. सहाय्यक संस्था निंबधक, सोलापूर विभाग, सोलापूर

~~किरकोळ बदल अहवाल~~ क्र. 209/२०१४

धीरज मेमोरीयल फांऊडेशन
सेक्टर नं. १८, प्लॉट नं. २३७,
शिवाजी पार्क, म. फुलेनगर,
चिंचवड, पुणे - १९

Exh. 1

धीरज मेमोरीयल फांऊडेशन
तर्फे अध्यक्ष .....
श्री. प्रदीप पोपटलाल कर्नावट -- अर्जदार

यात अर्जदार तर्फे अर्ज की,

(१) सदर कामी धीरज मेमोरीयल फांऊडेशन ही संस्था सन २००७ मध्ये मा. सहाय्यक निबंधक, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे कार्यालयात संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी करण्यात आली. संस्थेच्या स्थापनेपासून संस्थेचा कारभार ज्ञापन, नियम व नियमावलीप्रमाणे होत आहे. संस्थेमध्ये वेळोवेळी घटनेत आणि उद्देशात बदल करण्यात आलेले आहे. तसा बदल अहवाल सादर केला असून तो देखील मंजूर केला आहे.

(२) संस्थेचे कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. संस्था वेगवेगळ्या प्रकारे उद्देशांप्रमाणे आपले कार्यक्षेत्र व कामकाज वाढवत असून विविध संधी समाजातील गरजू व्यक्तींना उपलब्ध करुन देत आहे. सध्या संस्थेचे सामाजिक कार्य महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात सुरु आहे व संस्था इतर जिल्ह्यातही सामाजिक उपक्रम सुरु करत आहे व त्यासाठी प्रयत्नशील आहे. त्या करिता महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये विश्वस्त संस्थेचे कार्य वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

(३) संस्था ही विविध पध्दतीने संस्थेची कार्यपध्दती आणखी वाढविणेकरीता समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्तींचे मार्गदर्शन घेत असते. त्यातील बऱ्याच व्यक्ती संस्थेच्या कार्यात मदत करणेकामी उत्सुक असतात. अशा व्यक्तींना संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये समाविष्ट केल्यास त्यांचा सक्रीय सहभाग वाढून संस्थेच्या

PKarnavat

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर विभाग, सोलापूर.
07 FEB 2014
आवक क्रमांक - 940

MOU & Byelaws
DMF
201 / 202

उन्नतीसाठी त्यांचा मोलाचा सहभाग लाभतो आहे. संस्थेच्या जुन्या उद्देशामध्ये आयकर कायद्यातील तरतुदींचा उल्लेख नसल्यामुळे त्याचा फयादा त्यांना होत नसल्यामुळे मदतीचा ओघ कमी आहे. त्यामुळे आयकर खात्यातील तरतूदीचा लाभ घेण्यासाठी तशा दुरुस्ती घटनेत करणे आवश्यक असल्यामुळे तसा अर्ज सादर केला जात आहे. तसे ठराव कायद्यास अनुसरुन आणि घटनेतील तरतुदीनुसार पारीत करण्यात आलेले आहे. सर्व विश्वस्तांची आणि सभासदांची यास संमती आहे.

(४) संस्था सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम १९५० अन्वये नोंदणी केली असल्याने कलम २२ अन्वये बदल अर्ज दाखल करण्यात आला आहे. अर्जदाराने अर्जासोबत सभांदच्या नोटीसा, ठरावाच्या सत्यप्रती, ज्ञापन नियमावली, संस्थेचे नोंदणी प्रमाणापत्रे व इतर आश्यक कागदपत्रे जोडली आहेत.

## विनंती

१. अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येवून सोबत जोडलेला अनुसुची - अ ही दुरुस्ती घटना सदर सोसायटीस लागू केली जावी.

दिनांक : ७/२/१४
स्थळ : पुणे

PKarnavat
(प्रदीप पोपटलाल कर्नावट)

## प्रतिज्ञापत्र

मी उपनिर्दिष्ट अर्जदार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जात दिलेली सर्व माहिती माझ्या उत्तम माहिती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे. त्या प्रित्यर्थ मी आज रोजी या प्रतिज्ञापत्रावर सही करत आहे.

दिनांक : ७/२/१४
स्थळ : पुणे



PKarnavat
(प्रदीप पोपटलाल कर्नावट)

NOTARY
SATISH R. JADHAV
PIMPRI-CHINCHWAD
DIST.-PUNE
Regn. No. 7205
GOVERNMENT OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

BEFORE ME
7/2/2014
SATISH R. JADHAV
ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA
Satish Cycle Mart, Dattawadi,
Akurdi, Pune - 411 035.

Noted & Registered
at Serial Number
280/2014
07/2/2014

Issue notice to trustees an record and outgoing trustees by R.P.A.D. returnable on...............

Place - Solapur
Date:- 29/3/14 A.C.C.

Issue Public Notice in widely circulated daily news paper

Place - Solapur
Date :- 29/3/14 A.C.C.

Exh-16

| दाखल तारीख | ०६/०२/२०१४. |
|---|---|
| फैल तारीख | ०६/०२/२०१४. |
| निकाल तारीख | १३/०१/२०१५ |
| कालावधी | ०० वर्षे ११ महिना ०७ दिवस |

**सहाय्यक संस्था निबंधक, सोलापूर विभाग सोलापूर यांचे समोर**

**किरकोळ अर्ज क्र. २०१/२०१४**

**(संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२अ अन्वये अर्ज)**

**संस्थेचे नांव :**

**धीरज मेमोरिएल फौंडेशन, सेक्टर न.१८, प्लॉट न.२३७, शिवाजी पार्क, म.फुलेनगर, चिंचवड, पुणे.१९.**

नोंदणी क्र. : एफ - १९९२८सोलापूर.

13/01/15

प्रदीप पोपटलाल कर्नावट.
वय-६७ वर्षे, धंदा- व्यापार,
रा. धीरज रेसिडेन्सी, फलॅट न.०१,
प्लॉट न.७०३, सेक्टर न.१८,
शिवतेज नगर, चिंचवड, पुणे.१९. ------- **अर्जदार**

**विरुध्द**

कोणी नाही. -------- **सामनेवाला.**

**(न्यायनिर्णय)**

(जाहीर दिनांक १३/०१/२०१५)

१. अर्जदार यांनी दिनांक ०८/१२/२०१३ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत, दिनांक ३०/१२/२०१३ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आणी दिनांक ०२/०२/२०१४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या

उददेशात व नियम, नियमावलीत वाढ करण्याचे ठराव मंजुर झाल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र. ०३ येथे तुलनात्मक तक्ता, निशाणी क्रं.०४ येथे सुधारित परिशिष्ठ ब, निशाणी क्रं.०४/१ येथे येथे सुधारित परिशिष्ठ क, निशाणी क्रं.०६/१ येथे कार्यकारी मंडळाच्या सभेचा अजेंडा, निशाणी क्रं.०६/२ येथे कार्यकारी मंडळाच्या सभेचे इतिवृत्त, निशाणी क्रं.०६/५ येथे वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना, निशाणी क्रं.०६/६ येथे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, निशाणी क्रं.०६/३ येथे विशेष सर्वसाधारण सभेची सुचना, निशाणी क्रं.०६/४ येथे विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, निशाणी क्रं.१५ येथे सभासद यादी, निशाणी क्रं.०६/७ येथे जाहीर चौकशीची नोटीसीची स्थळप्रत, निशाणी क्रं.०८/१ येथे जाहीर चौकशीची नोटीस प्रसिध्द केलेबाबत दैनिक सुराज्यचा अंक, निशाणी क्रं.०८/२ येथे मुळ परिशिष्ठ ब व मुळ परिशिष्ठ क, निशाणी क्र.११ येथे अर्जदार यांचे पुराव्याचे शपथपत्र, निशाणी क्रं.०८/३ येथे परिशिष्ठ ०१ ची सत्यप्रत, निशाणी क्रं.०९ येथे परिशिष्ठ ०१ वरील विश्वस्तांचे हरकत नसले बाबत एकत्रित संमतीपत्र, निशाणी क्र.११ येथे पुराव्याचे शपथपत्र, निशाणी क्र.१२ येथे अर्जदार यांचे पुरावा संपल्याची पुरसिस, इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

13/01/15

२. अर्ज बिगर वादाचा आहे असे असले तरी तो कायदेशीर आहे का? ते हे पाहणे गरजेचे आहे त्याकरीता माझेसमोर खालीलप्रमाणे वादप्रश्न उपस्थित होतात. त्यांचे सकारण स्पष्टीकरण व निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वाद प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जात नमुद केले प्रमाणे संस्थेच्या | होय. |

| | | |
|---|---|---|
| | उददेशात बदल झाला आहे का? व अर्ज कायदेशीर आहे का? | ; |
| २ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात आला |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ करिता :-**

३. अर्जदार यांनी निशाणी क्र.११ येथे पुराव्याचे शपथपत्र दाखल करून अर्जातील मजकुर व कागदपत्रे शाबीत केली आहेत. अर्जदार यांनी अर्जासोबत दाखल केलेल्या निशाणी क्र.०८/२ वरील परिशिष्ट-क मधील परिच्छेद क्र. ०८ व ०९ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वार्षिक सर्वसाधारण सभेची गणसंख्या ३/५ असुन सभेची सुचना १४ दिवस अगोदर देणेची आहे. निशाणी क्रं.१५ येथे सभासद यादी पाहिली असता असे दिसुन येते की, संस्थेचे एकुण दहा सभासद आहेत पैकी सर्वजणांना कार्यकारी मंडळाच्या सभेची नोटीस दि. ०१/१२/२०१३ रोजी हस्तदेय मिळालेली आहे. तसेच निशाणी क्र.०६/२ वरील कार्यकारी मंडळाच्या सभेच्या इतिवृत्ताच्या अवलोकन केले असता असे दिसुन येते की, ठराव क्र. ०२ अन्वये सर्वानुमते संस्थेच्या उददेशात वाढ करण्याचे ठरले आहे. निशाणी क्रं.०६/५ येथे वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना पाहिली असता असे दिसुन येते की, सर्व सभासदांना वार्षिक सभेची नोटीस हस्तदेय मिळालेली आहे. निशाणी क्रं.०६/६ येथे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या अवलोकन केले असता असे दिसुन येते की, ठराव क्र. ०२ अन्वये सर्वानुमते संस्थेच्या उददेशात वाढ करण्याचे ठरले आहे. निशाणी क्रं.०६/३ येथे विशेष सर्वसाधारण सभेची सुचना पाहिली असता असे दिसुन येते की, सर्व सभासदांना वार्षिक

सभेची नोटीस दि. ०२/०२/२०१४ रोजी हस्तदेय मिळालेली आहे. निशाणी क्रं.०६/४ येथे विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या अवलोकन केले असता असे दिसुन येते की, ठराव क्र. ०२ अन्वये सर्वानुमते संस्थेच्या उददेशात वाढ करण्याचे ठरले आहे. कबुल तथ्यानुसार प्रस्तुतचा अर्ज बिगर वादाचा आहे. या सर्व तथ्यांचा एकत्रीत विचार करता अर्जात नमुद केले प्रमाणे बदल झाला आहे व अर्ज कायदेशीर आहे आहे या अनुमानास मी आलो आहे त्यानुसार वादप्रश्न क्र.१ होकारार्थी उत्तरी करुन वादप्रश्न क्र. २ च्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

13/01/15

( कि. रा. खोंद्रे )
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
सोलापूर विभाग, सोलापूर

दि. १३/०१/२०१५
स्थळ : सोलापूर

नक्कल तयार करणार
नक्कल तपासणार

प्रमाणित सत्य प्रत
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर.

Exh. 3

अर्ज दाखल दिनांक 13/1/15
नक्कल तयार दिनांक
नक्कल दिल्याचा दिनांक 20/1/15
नक्कल दिल्याचा दिनांक

सुधारीत ज्ञापन प्रत

परिशिष्ट - ब

# धीरज मेमोरीयल फांऊडेशन

## सेक्टर नं. १८, प्लॉट नं. २३७, शिवाजी पार्क, म. फुलेनगर, चिंचवड, पुणे - १९

या संस्थेचे ज्ञापन/मेमोरेण्डम ऑफ असोसिएशन/चे विधानपत्र

१) संस्थेचे नांव : **धीरज मेमोरीयल फांऊडेशन**

२) संस्थेचा पत्ता : व्दारा - अध्यक्ष.
सेक्टर नं. १८, प्लॉट नं. २३७, शिवाजी पार्क, म. फुलेनगर, चिंचवड, पुणे - १९

३) संस्थेचे उद्देश : खालीलप्रमाणे राहतील.

**१. शैक्षणिक :-**

जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी सर्व प्रकारचे शैक्षणिक कार्य करणे. उदा. बालवाडी, आंगणवाडी, सर्व भाषिक प्राथमिक शाळा, निवासी इंग्लीश मेडीयम स्कूल, हायस्कूल, कन्या महाविद्यालय, सैनिक शाळा, कन्याशाळा, रात्रशाळा, सर्व प्रकारच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरु करणे, सर्व प्रकारचे कॉलेजेस , तांत्रिक व औद्योगिक प्रशिक्षण वर्ग चालविणे, सार्वजनिक मुक्तद्वार वाचनालय, सर्वांगीण शैक्षणिक विकास इ. सुरु करणे, गरीब व होतकरु मुलांना आर्थिक व शैक्षणिक मदत करणे, संस्थेच्या वतीने जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे, त्यांच्या फायद्यासाठी असलेल्या शासनाच्या विविध योजना राबविणे, संगणक, टायपिंग यांचे प्रशिक्षण केंद्र सुरु करणे, जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी डी. एड्. बी. एड्., बी. पी. एड्., इ. महाविद्यालये सुरु करणे, चालविण्यास मदत करणे, नर्सिंग कॉलेज, पशुवैद्यकीय पदवी, पदविका, डी. फार्मसी, बी फॉर्मसी, आयुर्वेदिक महाविद्यालये, होमिओपॅथिक महाविद्यालये इ. अभ्यासक्रम चालू करणे, चालविण्यास मदत करणे, जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी निवासी आश्रमशाळा सुरु करणे, आंधासाठी शाळा सुरु करणे वसतिगृह उभारणे, फूटपाथवर काम करणा-या मुलांना शिक्षण व वसतिगृह उपलब्ध करुन देणे, जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या मागासवर्गीय महिलांच्यासाठी वेगळेवेगळे प्रकारचे प्रशिक्षण केंद्र चालविणे, निराधार, निराश्रीत व आनाथ मुलां - मुलींसाठी आनाथाश्रम, आश्रमशाळा चालविणे, मागासवर्गीय मुलांसाठी वसतीगृह, बालसदन, बालकाश्रम, बालगृह सुरु करणे व चालविणे, जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी केंद्रीय समाज कल्याण सल्लागार बोर्ड व समाजकल्याण सल्लागार बोर्ड मुंबई यांच्या विविध प्रकारच्या योजना राबविणे, पाळणाघर खादीग्रामोद्योग महामंडळाच्या विविध प्रकारच्या शैक्षणिक योजना व व्यावसाय प्रशिक्षण केंद्र सुरु करणे व चालविणे. सदर उद्देशांचा फायदा हा फक्त लहान विद्यार्थी म्हणजे नर्सरी पासून ते उच्च माध्यमिक शाळा अथवा त्या दर्जाच्या प्रकल्पांतील विद्यार्थ्यांनाच असेल अथवा मर्यादीत राहील.

**२. क्रिडा :-**

जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी वेगवेगळ्या खेळांचे राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय सामने भरविणे व त्यास भाग घेणे, कोचिंग कॅम्प आयोजित करणे. व्यायमशाळा बांधणे व व्यायाम शाळा चालविणे, व्यायामाचे व योगासनाचे प्रशिक्षण देणे. वेगळ्या प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करणे. कराटे या प्रकाराबरोबरच सैनिकी व आत्म संरक्षणासाठी वेपन्स प्रशिक्षण केंद्र चालविणे, युवक युवतीमध्ये देशी विदेशी खेळांची आवड निर्माण करुन क्रिडा शिबीरे आयोजित करणे, संहभाग घेणे, क्रिडा स्पर्धा आयोजित करुन क्रिडांगण उपलब्ध करुन देणे, क्रिडापटूंना राहण्यासाठी सोय उपलब्ध करणे, क्रिडा प्रेमींना क्रिडा साहित्य उपलब्ध करुन देणे. सदर उद्देशांचा फायदा हा फक्त लहान विद्यार्थी म्हणजे नर्सरी पासून ते उच्च माध्यमिक शाळा अथवा त्या दर्जाच्या प्रकल्पांतील विद्यार्थ्यांनाच असेल अथवा मर्यादीत राहील.

**३. सामाजिक :**

जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी व्याख्यानमाला, चर्चा, परिसंवाद वक्तृत्व, निबंध, रांगोही, चित्रकला, संगीत, वाचन, काव्यव, नाट्य, नृत्य, इत्यादीच्या स्पर्धा आयोजित करणे, सहभाग घेणे, प्रशिक्षण केंद्र सुरु करणे.

जैन अल्पसंख्यांक समाज व इतर समाजासाठी सर्व प्रकारचे सामाजिक शिबिरे आयोजित करणे, माताबालसंगोपन केंद्राचे विविध प्रकारचे योजना राबविणे, बालकाश्रम, बालसदन चालविणे, वृक्षारोपण करणे, मंगल कार्यालय बांधणे व चालविणे, गोरगरिबांच्या करीता अन्नछत्र मंडळ सुरु करणे.

| | | |
|---|---|---|
| Sd/-<br>अध्यक्ष | Sd/-<br>उपाध्यक्ष | Sd/-<br>सचिव |
| PPKarnavat | | [signature] |

ASSISTANT CHARITY COMMISSIONER SOLAPUR REGION SOLAPUR
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर.

४) या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळाच्या सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपवण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांचे संपूर्ण नांव, पत्ते, पद, वय, राष्ट्रीयत्व व व्यवसाय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | सभासदांचे नांव | पत्ता | पद | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. प्रदिप पोपटलाल कर्नावट | धीरज रेसिडेन्सी, फ्लॅट नं. १, पॉट नं. ७०३, सेक्टर १८, शिवतेज नगर, चिंचवड, पुणे | अध्यक्ष | सज्ञान | भारतीय | व्यापार |
| २. | श्री. संदिप पोपटलाल कर्नावट | संस्कार बंगला, २३७/१८, शिवाजी पार्क चिंचवड, पुणे | उपाध्यक्ष | सज्ञान | भारतीय | व्यापार |
| ३. | श्री. संजय रमणभाई पटेल | ३/ए, तुषार सोसायटी, अपोझिट गेलानी पेट्रोलपंप, निजामपूरा, वडोरडा | सचिव | सज्ञान | भारतीय | व्यापार |
| ४. | श्री. सुदिप पोपटलाल कर्नावट | प्रसन्न रेसिडेन्सी प्लॉट नं. ४ सी - ३/१, निगडी, पुणे | सहसचिव | सज्ञान | भारतीय | व्यापार |
| ५. | श्री. संजय मुलतानचंद कासवा | २ ए/२१ रस्टन कॉलनी, चिंचवड, पुणे | खजिनदार | सज्ञान | भारतीय | व्यापार |
| ६. | श्री. मुलतानचंद उत्तमचंद कासवा | २ ए/२१ रस्टन कॉलनी, चिंचवड पुणे | सदस्य | सज्ञान | भारतीय | व्यापार |
| ७. | श्री. ज्योस मथ्यु अॅलेक्झांडर | जायसी बंगला, १८/३८, जिजामाता पार्क, पी.सी.एन.टी.डी. ए क्रिष्णा नगर, चिंचवड, पुणे | सदस्य | सज्ञान | भारतीय | व्यापार |

Sd/-
अध्यक्ष

Sd/-
उपाध्यक्ष

Sd/-
सचिव

PPKarnavat

५) यात आम्ही खालील सह्या करणारे वरील नावाच्या संसथेचे सदस्य जाहीर करतो की, या संस्थेची नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून वरील नावाची संस्था ही आज दिनांक ३०/११/२००७ रोजी स्थापन केली असुन ती संस्था नोंदीण अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही यावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदांचे नांव | पत्ता | सही |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रदिप पोपटलाल कर्नावट | धीरज रेसिडेन्सी, फ्लॅट नं. १, पॉट नं. ७०३, सेक्टर १८, शिवतेज नगर, चिंचवड, पुणे | Sd/- |
| २. | श्री. संदिप पोपटलाल कर्नावट | संस्कार बंगला, २३७/१८, शिवाजी पार्क चिंचवड पुणे | Sd/- |
| ३. | श्री. संजय रमणभाई पटेल | ३/ए, तुषार सोसायटी, अपोझिट गेलानी पेट्रोलपंप, निजामपूरा, वडोरडा | Sd/- |
| ४. | श्री. सुदिप पोपटलाल कर्नावट | प्रसन्न रेसिडेन्सी प्लॉट नं. ४ सी - ३/१, निगडी, पुणे | Sd/- |
| ५. | श्री. संजय मुलतानचंद कासवा | २ ए/२१ रस्टन कॉलनी, चिंचवड पुणे | Sd/- |
| ६. | श्री. मुलतानचंद उत्तमचंद कासवा | २ ए/२१ रस्टन कॉलनी, चिंचवड पुणे | Sd/- |
| ७. | श्री. ज्योस मथ्यु अॅलेक्झांडर | जायसी बंगला, १८/३८, जिजामाता पार्क, पी.सी.एन.टी.डी. ए क्रिष्णा नगर, चिंचवड, पुणे | Sd/- |

स्थळ : मोहोळ
दिनांक : / /२००७
सदंर सह्यांची ओळख अर्जदाराने खात्री करुन दिलेली आहे व त्यांनी माझे समक्ष सही केलेली आहे.
वकील
Sd/-

PPKarnavat

वरील सर्वांना मी ओळखतो व त्यांनी माझे समक्ष सह्या केलेल्या असुन त्या खऱ्या व बरोबर आहेत त्याचे सत्यतेकरिता मी येथे सही केली आहे.
Sd/-
अर्जदार

Exh. 4

<u>सुधारीत नियम व नियमावली प्रत</u>

परिशिष्ट - क

# धीरज मेमोरीयल फांऊडेशन

**सेक्टर नं. १८, प्लॉट नं. २३७, शिवाजी पार्क, म. फुलेनगर, चिंचवड, पुणे - १९**

<u>या संस्थेचे नियम व नियमावली</u>

**१) नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्यख्या -**

अ) ट्रस्ट : म्हणजे **धीरज मेमोरीयल फांऊडेशन सेक्टर नं. १८, प्लॉट नं. २३७, शिवाजी पार्क, म. फुलेनगर, चिंचवड, पुणे - १९** ही विश्वस्त संस्था होय

ब) कार्यकारी मंडळ : म्हणजे या संस्थेच्या व्यवस्थापनेसाठी नेमलेले किंवा निवडलेले सदस्यांचे मंडळ.

क) ट्रस्टी : म्हणजे त्या व्यक्तिकडे केवळ त्याकडेच किंवा इतर व्यक्तिच्या समवेत विश्वस्त मालमत्ता विहित असेल ते व्यक्ति.

ड) कार्यक्षेत्र : म्हणजे संस्था ज्या क्षेत्राच्या मर्यादेत कार्य करणार आहेत ते क्षेत्र.

इ) सभासद : म्हणजे कोणतीही सज्ञान भारतीय व्यक्ती जी संस्थेच्या नियमाला बांधील राहून विहित नमुन्यात अर्ज करुन कार्यकारी मंडळात त्या अर्जाचा स्विकार केल्यानंतरची व्यक्ती.

ई) मिळकत : म्हणजे संस्थेच्या मालकीची पण संसथेच्या ताब्यात दिलेली सर्व गुंतवणूक रक्कम, स्थावर व जंगम मिळकत यामध्ये विशिष्ट हेतूसाठी संस्थेस देणगी रुपाने स्विकारणेच्या रक्कमेचा मालमत्तेचा समावेश राहिल.

**२) कार्यक्षेत्र** : महाराष्ट्र राज्य राहिल.

**३) हिशोबाचे वर्ष** : ०१ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहिल.

**४) सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत -**

कोणत्याही सज्ञान भारतीय व्यक्तीस जिला या संस्थेचे नियम मान्य आहेत अशा व्यक्तीने विहीत नमून्यात अर्ज केल्यानंतर व ठरावीक फी भरल्यानंतर व अशा अर्जाचा कार्यकारी मंडळात स्विकार केल्यानंतर त्या व्यक्तीस संस्थेचे सभासदत्व प्राप्त होईल.

**५) सभासदांचे प्रकार -**

अ) साधारण सभासद : वार्षिक रुपये ६०/- वर्गणी आर्थिक वर्ष सुरु झालेनंतर एक महिन्यचे आत रितसर पैसे भरुन साधारण सभासद होता येईल.

ब) आजीव सभासद : रुपये १००१/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणगीदार एकावेळी देवून देणगीदाराच्या इच्छेनूसार व कार्यकारी मंडळाचे मान्यतेने देणगीदारास आजीव सभासद होता येईल.

| | | |
|---|---|---|
| Sd/- | Sd/- | Sd/- |
| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **सचिव** |
| PPKarnawat | | |

६) सभासदांचे सदस्यत्व रद्द होणेबाबत -

अ) सभासद फौजदारी गुन्ह्याखाली शिक्षेस पात्र झाल्यास व तो सिध्द झाल्यास.

ब) त्यांचेकडून नैतिक अध:पतन झाल्यास व तो सिध्द झाल्यास.

क) एखाद्या सदस्याने संस्थेच्या हिताविरुध्द वर्तन केल्यास, गैरवर्तन केल्यास व अशा गोष्टी कार्यकारी मंडळाच्या नजरेसमोर आल्यानंतर व ते सिध्द झाल्यानंतर सर्वसाधारण सभामध्ये बहुमताने सभासदांचे सदस्यत्व रद्द केलेस.

ड) राजीनाम दिल्यास.

इ) वार्षिक वर्गणी न भरल्यास.

ई) मरण पावल्यास व सलग तीन सभांना गैर हजर राहिल्यास.

सभासदांचे सदस्यत्व रद्द होईल.

७) सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार -

१. सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व निर्णयी सभा म्हणून ओळखली जाईल.

२. या सभेस सर्वसभासद भाग घेवू शकतील.

३. उपस्थित सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम बाकी नसावी. बाकी असल्यास त्या सदस्याला मतदानात भाग घेता येणार नाही. त्याचप्रमाणे ज्या सदस्याला संस्थेत प्रवेश घेवून सहा महिने झाले नसल्यास त्यास उपस्थित राहता येईल, मात्र मतदानात भाग घेता येणार नाही.

४. सर्वसाधारण सभा व वार्षीक सर्वसाधारण सभा ही वर्षातून एकदा तरी घेणेत येईल. मात्र हिशोबाचे वर्ष संपल्यापासून सहा महिन्याचे आत ही सभा घेणे बंधनकारक राहील.

अधिकार -

१. कार्यकारी मंडळाचे चालविलेल्या कामावर नियंत्रण ठेवणे.

२. वार्षिक हिशोब मंजूर करणे.

३. मागील सभेचा अहवाल वाचून दाखविणे व कायम करणे.

४. पुढील वर्षाचे नविन अंदाजपत्रके तयार करणे व मंजूर करणे.

५. वेळेवर अध्यक्षांचे परवानगीने येणारे ठराव सभेसमोर मंजूर अगर नामंजूर करणे.

६. कार्यकारी मंडळाची निवड करणे.

७. ऑडीटरची नेमणूक करणे.

८. आवश्यकतेनूसार नियम व नियमावली तसेच संस्थेचे उद्देशात कांही बदल करणे.

८) सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या -

सर्वसाधारण सभेची १४ पूर्ण दिवसाची नोटीस सदस्यामध्ये यु.पी.सी./हस्तपोच प्रस्तुत करणेत येईल, त्यात अशी सभा ज्या तारखेस, ज्यावेळी व जेथे घेण्यात येईल ती तारीख, वेळ व जागा सदर सभेत करण्यात येणारे कामकाज निर्दिष्ट करण्यात येईल व सदरची नोटीस संस्थेच्या कार्यालयात लावली जाईल. सर्वसाधारण सभेचा कोरम पूर्ण होणेसाठी सर्व प्रकारचे ३/५ सभासद उपस्थित असणे आवश्यक आहे. जर सभासदांच्या सभेच्या नोटीसामध्ये असा उल्लेख असला तरीही आवश्यक कोरम पूर्ण न झाल्यास त्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकुब झाल्यास सभा तेथेच होईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| PKarnaat | | |

९) विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्ये -

अध्यक्ष व कार्यकारी मंडळास जरुर वाटल्यास विशेष सर्वसाधारण सभा बोलविली जाईल तसेच कमीत कमी एकूण संखेच्या ३/५ सभासदांनी लेखी मागणी केल्यास ते मागणीपत्र सादर झाल्यानंतर एक महिन्याचे आत रितसर अशी विशेष सभा अध्यक्ष सचिवांच्या मदतीने बोलावतील. या सभेची नोटीस व विषयपत्रिका सभासदांना किमान १० दिवस आधी दिली जाईल व अशा सभेत विषय पत्रिका नसलेल्या विषयांचा विचार केला जाणार नाही.

१०) संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना -

संस्थेचे कार्यकारी मंडळ एकूण कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ९ सभासदांचे राहील. निवडून आलेले कार्यकारी मंडळ अपापसात खालीलप्रमाणे पदाधिकारी निवडतील.

अ) अध्यक्ष, ब) उपाध्यक्ष, क) सचिव, ड) सहसचिव, इ) खजिनदार, ई) उर्वरीत सदस्य.

११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत -

अ) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल एकूण ५ वर्षाचा राहील.

ब) कार्यकारी मंडळाची निवड दर ५ वर्षानी सर्वसाधारण सभेत बहुमताने निवडणूक पध्दतीने होईल.

क) जर २/३ सभासदांनी संस्थेकडे गुप्त मतदानाने निवडणूकीची मागणी केली तर त्याप्रमाणे निवडणूक घेण्यात येईल व त्या निवडणूकीची पध्दत खालील प्रमाणे आहेत.

१. संस्थेच्या कोणत्याही प्रकारची बाकी येणे असल्यास निवडणूकीसाठी तो सदस्य अपात्र राहील.

२. निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती १५ दिवसापूर्वी करावी.

३. सहा महिने सभासद राहिल्यांतरच त्यास मतदानाचा अधिकार राहिल.

४. निवडणूकीच्या तारखेची सूचना १० दिवसापूर्वी ऑफीस नोटीसीव्दारे द्यावी.

५. निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने होईल.

१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांचे कामे -

अ) अध्यक्ष : सभेचे कामकाज चालविणे व हितसंबंधीचे योग्य ते आदेश देणे, संस्थेच्या कारभारावर व शाखेवर नियंत्रण ठेवणे, सर्वसाधारण सभा आयोजित करणे, जर सचिवाने एखादी सभा बोलाविली नाही तर अशी सभा अध्यक्ष बोलावेल.

ब) उपध्यक्ष : अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांचे काम करणे किंवा त्यांना त्यांचे कार्यात योग्य ते सहकार्य करणे.

क) सचिव :

१. कार्यकारी मंडळाच्या सभा बोलावणे.,

२. संस्थेचा पत्रव्यवहार अध्यक्षांच्या संमतीने करणे.

३. संस्थेच्या दृष्टीने आवश्यक असल्यास कोर्ट कचेरीचे कामे करणे.

४. संस्थेच्या कार्यावर लक्ष ठेवणे.,

५. संस्थेच्या वार्षिक खर्चाचे बिले मंजूर करुन देणे.

६. ठरावाप्रमाणे मंजूर झालेले ठराव अंमलात आणणे.

| Sd/- अध्यक्ष | Sd/- उपाध्यक्ष | Sd/- सचिव |
|---|---|---|
| PKarawat | | |

ड) सहसचिव :

सचिवांच्या गैरहजेरीत सचिवंचे काम करणे किंवा त्यांना त्यांच्या कार्यात योग्य ते सहकार्य करणे.

इ) खजिनदार :

संस्थेच्या आर्थीक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे, हिशोब लिहीणे अगर लिहून घेणे. हिशोब पूर्ण झाल्यावर सचिवांसमोर ठेवणे. हिशोबाच्या पुस्तकावर वार्षिक पत्रके तयार करणे, रक्कमेची देवाण घेवाण करणे, ऑडीटर यांनी हिशोब तपासून काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे.

ई) सदस्य :

संस्थेच्या सर्व कामात सहकार्य करणे, मिटींगमध्ये व मतदानात भाग घेणे.

१३) कार्यकारी मंडळाची सभा, मागणीची सभा -

कार्यकारी मंडळाची सभा दर तीन महिन्यातून एकदा तरी बोलाविली पाहिजे. कार्यकारी मंडळाच्या ३/५ सभासदांची लेखी मागणी केल्यास तातडीची कार्यकारणी सभा अध्यक्षांनी तीन दिवस अगोदर बोलाविली पाहिजे.

१४) कार्यकारी मंडळाचे सभेची सुचना व गणसंख्या -

कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना सात दिवस अगोदर यु.पी.सी. ने पाठविलेली पाहिजे व सदर सभेत एकूण ३/५ सभासदांचा कोरम राहिल. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा आर्ध्या तासाने तेथेच सभा भरेल, त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

१५) कार्यकारी मंडळाची निवडणूकीचे नियम -

१. संस्थेची कोणत्याही प्रकारची बाकी येणे असल्यास निवडणूकीसाठी तो सदस्य अपात्र राहिल.
२. निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती १५ दिवसांपूर्वी करावी.
३. सहा महिने सभासद राहिल्यानंतरच त्यास मतदानाचा अधिकार राहिल.
४. निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने होईल.
५. निवडणूकीच्या तारखेची सुचना १० दिवसापूर्वी ऑफिस नोटीसीव्दारे द्यावी.

१६) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत -

सभासद व पदाधिकारी यांनी राजीनामा द्यावयाचा असल्यास तो त्यांनी अध्यक्षांच्या जवळ द्यावा. आलेला राजीनामा कार्यकारी मंडळापूढे ठेवून बहुमताने मंजूरी द्यावी. आलेला राजीनामा मंजूर होईपर्यंत सभासदांचे पद कायम राहिल एखाद्या ट्रस्टीचे मृत्यूमुळे किंवा राजीनाम्यामुळे किंवा एखादी जागा रिकामी झाली तर त्या जागी नविन सभासद कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने घेता येईल. अध्यक्षांनी उपाध्यक्षांकडे राजीनामा द्यावा.

१७) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये -

१. संस्थेच्या सेवकांची नेमणूक करणे, त्यांच्यावर लक्ष, नियंत्रण ठेवणे, त्यांना कामावरुन काढणे की, ज्यामुळे संस्थेच्या कामकाज व्यवस्थित चालेल.
२. संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या इतर शाखेवर नियंत्रण ठेवणे.
३. संस्था चालविण्यासाठी आवश्यक असलेले किरकोळ नियम तयार करणे.
४. सर्वसाधारण सभेच्या ठरावाची पुर्तता करणे.

| | | |
|---|---|---|
| Sd/-<br>अध्यक्ष | Sd/-<br>उपाध्यक्ष | Sd/-<br>सचिव |

PPKarnavat

५. संस्थेच्या वार्षिक कार्यकारी मंडळाची यादी तयार करुन विभागीय असिस्टंट ऑफ सोसायटीज यांचे कार्यालयात त्याच्या ठरावाच्या नकलेसहीत दाखल करणे. त्याचप्रमाणे संस्थेच्या मालमत्तेत व मंडळात बदल झाल्यास अर्ज विभागीय कार्यालयात पाठविणे.

६. भासदांची यादी ठेवणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांची नोकरीचे अटीचे पुस्तक कायद्यप्रमाणे ठेवणे त्याबाबतीत परिशिष्ट - २ प्रमाणे माहिती रजिस्ट्रार यांचे कार्यालयात दरवर्षी पाठविणे.

७. जमाखर्चाचे हिशोब ठेवून ऑडीट करणे व ते सर्वसामान्य सभेपुढे ठेवणे.

८. उपसमित्या नेमणे किंवा एखाद्या कामासाठी एखाद्या सदस्याला अधिकार देणे.

९. कार्यकारी मंडळाचे सभेत एकूण ३/५ सभासदांचा कोरम राहिल. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने तेथेच भरल्यास कोरमची आवश्यकता राहणर नाही.

१०. संस्थेच्या हितासाठी आवश्यक असलेले इतर योग्य ते कायदेशिर कार्य करणे.

**१८) संस्थेचा निधी व मिळकत विनीयोग -**

संस्थेचे निधीमध्ये सभासद वर्गणी, देणगी, सरकारी अनुदान तसेच इतरचा समावेश होईल. त्याचा विनीयोग उद्देशावर करण्यात येतील.

**१९) उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतूद -**

उद्देशासाठी १००% अशी तरतूद राहील.

**२०) गुंतवणूक किंवा ठेवी व कर्ज यासंबधी तरतूद -**

कलम ३५ व ३६ प्रमाणे (३) मा. धर्मादाय सह आयुक्त यांची पुर्वपरवानगी ठेवी किंवा अनामत रक्कम स्विकारणयात येतील.

**२१) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणेबाबतची तरतूद -**

स्थावर मालमत्तेची खरेदी विक्री करताना सर्वसाधारण सभेची मंजूरी घेवून कलम ३५ प्रमाणे खरेदी व कलम ३६ (१) प्रमाणे विक्रीस मा. जॉईन्ट चेरिटी कमिशनर यांचे पूर्व परवानगीने स्थावर मालमत्ता खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातील.

**२२) बँक खाते -**

ट्रस्ट ॲक्ट प्रमाणे मान्यता प्राप्त बँकेत संस्थेचे खाते उघडण्यात येतील व बँकेतून पैसे काढण्याचे अधिकार, अध्यक्ष, सचिव, खजिनदार या तिघांपैकी कार्यकारी मंडळ ठरविल त्या दोघांचे संयुक्त सहीने करण्यात येतील.

**२३) संस्थेचे नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद -**

वेळोवेळी संस्थेची सभा बोलावून गरजेनूसार ठराव पारीत करुन संस्थेच्या उद्देशामध्ये बदल, वाढ आणि दुरुस्ती करता येईल. परंतु मा. आयुक्त इंनकमटॅक्स ऑफीस पुणे अथवा सक्षम इंनकमटॅक्स अधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय संस्थेच्या उद्देशामध्ये कोणतीही बदल, वाढ अथवा दुरुस्ती करता येणार नाही. जर यदाकदाचीत असे केलेगेल्यास तो बदल बेकायदेशीर राहील. संस्थेच्या उद्देशामध्ये बदल, वाढ आणि दरुस्तीस मा. आयुक्त इंनकमटॅक्स ऑफीस पुणे अथवा सक्षम इंनकमटॅक्स अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असणार आहे.

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| PKarnarat | | |

२४) **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत -**

१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी महाराष्ट्र संस्था नोंदणी अधिनीयम १९७१ मधील नियम क्रं. १५ अनूसूची प्रमाणे क्रं. ६ चे नमुन्यात ठेवण्यात येतील. तसेच अनुसूची क्रं. १ व २ चेही नमुने ठेवण्यात येतील.

२५) **संस्थेच्या नावांत व उद्देशात बदल करण्याबाबतीची तरतूद -**

संस्थेचे नांव अथवा उद्देशात बदल करावयाचा असल्यास अथवा दोन संस्थेचे विलिनीकरण करावयाचा असल्यास १८६० चे नोंदणी अधिनियमातील कलम १२ व १२(अ) प्रमाणे कार्यवाही करण्यात येतील.

२६) **विसर्जन -**

जर यदाकदाचीत सर्व विश्वस्तांच्या विचाराअंती आणि एकमताने सदर संस्था विर्सजन करावयाचे असल्यास ठराव पारीत करुन करावयाचे आहे. संस्थेचे विसर्जन करताना संस्थेची असलेली मिळकत, निधी, शाखा यांचे येणे - देणे ही दुसऱ्या संस्थेस वर्गकरता येवू शकते. परंतु समान उद्देश असलेले दुसरी संस्था ही इंनकम टॅक्स ॲक्ट चे कलम १२ अ प्रमाणे नोंदणी कृत असलेल्या संस्थेस हस्तांतर करणे बंधनकारक राहणार आहे. संस्थेची मालमत्ता कुठल्याही परिस्थितीत सभासदांना देता येणार नाही.

## दाखला

प्रमाणीत करण्यात येते की,

# धीरज मेमोरीयल फांऊडेशन

**सेक्टर नं. १८, प्लॉट नं. २३७, शिवाजी पार्क, म. फुलेनगर, चिंचवड, पुणे - १९**

या संस्थेचे नियम व नियमावलीची सत्य प्रत असे.
स्थूळ : मोहोळ
दिनांक : / /२००७

| अ.क्र. | नांव | पद | सही |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रदिप पोपटलाल कर्नावट | अध्यक्ष | Sd/- PPKarnavat |
| २. | श्री. संदिप पोपटलाल कर्नावट | उपाध्यक्ष | Sd/- |
| ३. | श्री. संजय रमणभाई पटेल | सचिव | Sd/- |

PPKarnavat

20/1/15

ASSISTANT CHARITY COMMISSIONER SOLAPUR REGION SOLAPUR

सहाय्यक धर्मादाय आयुक्त
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर.